नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 28/12/2021 (मंगळवार)
(सायंकाळ)

---

## घरफोडी करणारा आरोपी जेरबंद
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कार्यवाही

दि. 07/11/21 चे 17.10 वा. फिर्यादी नामे- श्रीवंता मानीकराव फुटाने वय 60 वर्ष, रा. दहेगाव रंगारी, वार्ड नं 04 यांनी पो.स्टे. खापरखेडा येथे रिपोर्ट दिली की, त्या दिवाळी सना निमीत्य भाउबीज चा कार्यक्रम करीता मोठी मुलगी शुभांगी जंगले रा. नरसाडा नागपुर येथे गेली होती. त्यादरम्यान दि 07/11/21 चे सकाळी 09.30 वा. दरम्यान फिर्यादी चे घरमालकाने फोन करून सांगीतने की, 'तुमच्या दाराचे लॉक तुटलेले आहे'. यावरून फिर्यादी यांनी त्यांचे राहते घरी येवून पाहीले असता बेडरूम मधील आलमारी चे दार उघडे हाते. लॉकर चे लॉक तोडुन त्यामधील रोख रक्कम 35,000/-रू., सोन्याचे बूंदे कि 12,500/-रू. व नथनी कि अंदाजे 2,500/-रू. तसेच नोकीया 8 जी 5 एक्स कंपनीचा मोबाईल कि 14,999/-रू. असा एकुण कि. 64,999/-रू. चा माल दि. 6/11/21 चे 06.30 वा. ते 07/11/21 चे 09/30 वा. दरम्यान अज्ञात आरोपीने घराचे लॉक तोडून घराचे आत प्रवेश करून चोरून नेले.

यावरून पोस्टे खापरखेडा येथे अपराध क्रमांक 474/2021 कलम 457, 380 भादंवि चा गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हे करीत असतांना त्यांना दिनांक 27/12/2021 रोजी गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, मौजा महादुला येथील इसम नामे- आशिष देशपांडे याचे कडे चोरीचा मोबाईल आहे. अशी विश्वसनिय माहिती मिळाल्यावरुन, स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने कोराडी येथे आशिष दामोधर देशपांडे यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने दहेगांव रंगारी येथे काही दिवसापुर्वी चोरी केल्याची कबुली दिली व त्या चोरी मध्ये त्याला नाकातील एक नथ सोन्याची व 35,000/- रुपये नगदी तसेच नोकीया कंपनीचा मोबाईल चोरल्याचे सांगितले. यावरुन सदर गुन्हयात चोरीस गेलेला नोकीया कंपनीचा मोबाईल किंमत 14,999/-रु. आरोपी नामे- आशिष दामोधर देशपांडे वय 30 वर्षे रा. महादुला बाजार चौक वार्ड नं. 2 याचे जवळ मिळुन आला. तसेच त्याला सदर गुन्हयात चोरीस गेलेली सोन्याची नथ व इतर दागिण्याबाबत विचारणा केली असता, नथ किंमती 2,500/-रु. त्याने एका स्टील च्या डब्ब्यात लपवुन ठेवल्याचे सांगितले. आरोपी याचे जवळुन नोकिया कंपनीचा मोबाईल सिम सह व सोन्याची नथ असा एकुण कि. 17,499/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर कार्यवाही श्री. विजयकुमार मगर पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण, श्री. राहुल माकणीकर अपर पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरिक्षक अनिल जिट्टावार, सपोनि अनिल राऊत, पोलिस हवालदार विनोद काळे, ज्ञानेश्वर राऊत, नापोशि शैलेश यादव, पोशि विरेन्द्र नरड, प्रणय बनाफर व चासफौ साहेबराव बहाळे यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर